**महाराष्ट्र शासन**

**इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था**

**(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**

**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** - mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती/पीएचडी विभाग/नागपूर/2022/2025-26 दिनांक - 24.06.2024

## सन २०२१, सन २०२२ व सन २०२३ या वर्षात महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी दि. ०१ जाने, २०२५ ते दि. ३० जुन, २०२५ या कालावधीतील सहामाही संशोधन प्रगती अहवाल सादर करण्याबाबत सुचना.

*************************************************

सन 2021, सन 2022 व सन 2023 महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी दि. 01 जाने, 2025 ते दि. 30 जुन, 2025 या कालावधीतील सहामाही संशोधन प्रगती अहवाल सादर करण्याबाबत पुढील सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

1. अवार्ड लेटर प्राप्त उमेदवारांनी दि.01 जाने, 2025 ते दि.30 जुन, 2025 या कालावधीतील सहामाही संशोधन प्रगती अहवाल व त्यासंबधित आवश्यक कागदपत्रे तसेच पुरावे या कार्यालयात हार्ड कॉपी स्वरुपात जमा करावेत.
2. तसेच आवश्यक सर्व कागदपत्र व माहिती ही MIS वर देखील अपलोड करावी.
3. ज्या विद्यार्थ्यांनी आपले बँक खाते आधार क्रमांकाशी सीडिंग केलेली नाही किंवा खात्याची मर्यादा 3 लक्ष पेक्षा कमी आहे त्यांनी आपले बँक खाते तातडीने सिडिंग करुन आपल्या खात्याची मर्यादा वाढवून घ्यावी.
4. ज्या विद्यार्थ्यांचे नोंदणी दिनांकापासून 5 वर्ष पुर्ण झालेले आहेत अश्या विद्यार्थ्यांनी आपला संशोधन अहवाल सादर करु नये, सादर केल्यास आपणास कोणतीही रक्कम अदा करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
5. ज्या विद्यार्थ्यांनी दि.01 जाने., 2025 ते दि.30 जुन, 2025 या कालावधीत आपला संशोधन प्रकल्प/शोध प्रबंध (Thesis) विद्यापीठात सादर केलेला आहे, त्या विद्यार्थ्यांनी त्यांचा अंतिम सादर केलेला संशोधन अहवाल/शोध प्रबंध या कार्यालयास सादर करावा. त्याच्या सोबत पीएचडी झाल्याबाबत नोटीफिकेशन, डिग्री/प्रोविजनल डिग्री, मार्कशीट ओरीजनल व कलर प्रती तसेच

शेवटचा संशोधन प्रगती अहवाल व त्यासंबधित आवश्यक कागदपत्रे या कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

6. जे विद्यार्थी जुलै 2025 ते डिसें. 2025 या कालावधीमध्ये आपला संशोधन अहवाल सादर करणार असतील किंवा त्यांचा 5 वर्षाचा कालावधी संपणार असेल त्यांनी या कार्यालयाला तसे लेखी कळविणे बंधनकारक आहे. त्या विद्यार्थ्यांचे अंतिम 6 महिन्यांची पीएचडी अधिछात्रवृत्तीची रक्कम पीएचडी नोटीफिकेशन व आवश्यक कागदपत्र सादर केल्यानंतर प्रदान करण्यात येणार आहे.
7. विहित कालावधीत कागदपत्रे जमा न करणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर कालावधीची रक्कम पुढील सहामाही संशोधन अहवालाच्या वेळी कागदपत्रे तपासून देण्यात येतील.
8. संशोधन अहवाल सादर करण्यासाठी पुढील कागदपत्रे विहित कालावधीतच कार्यालयात जमा करण्यात यावीत.

- प्रपत्र अ : सहामाही संशोधन अहवाल गोषवारा
- Annexure II - Half Yearly Progress Report along with an abstract of the research work done in about 500 words.
- विद्यापीठ स्तरावर झालेला सहामाही संशोधन अहवाल (RRC/RAC रिपोर्ट)
- Annexure III - Continuation Certificate
- Annexure IV - Utilization Certificate
- Annexure VI - HRA Certificate, Required documents
- Annexure VII - Details of Monthly Attendance with Biometric Attendance Report
- Annexure VIII - Up gradation Certificate (if applicable)
- Annexure X - नोकरी करीत नसल्याबाबत स्वयंघोषणा पत्र
- Annexure XI - बँकेचे प्रमाणपत्र
- सूचनांमध्ये नमूद इतर कागदपत्रे व पुरावे

9. वरील सर्व Annexure महाज्योतीच्या संकेतस्थळावर **"महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती** 2021,2022 **व** 2023 **मध्ये निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांकरिता दि**. 01 **जाने**, 2025 **ते दि**. 30 **जुन**, 2025 **या कालावधीतील अधिछात्रवृत्तीकरीता अहवाल नमुने (Formats)"** या नावाने उपलब्ध Tab मध्ये सुचना फलकात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

10. आपल्या संशोधन केंद्रावर बायोमेट्रिक हजेरी नोंद होत नसल्यास मार्गदर्शक, संशोधन केंद्र प्रमुख, व कुलसचिव यांचे नॉन बायोमेट्रिक प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील, त्याशिवाय हजेरीपत्रक गृहीत धरण्यात येणार नाही.

11. HRA प्रमाणपत्रासोबत वसतीगृहात राहत असल्यास वसतीगृहाचे प्रमाणपत्र व पावती तसेच वसतीगृहात राहत नसल्यास नॉन होस्टेलर प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

12. सहामाही संशोधन अहवाल व संबंधीत कागदपत्रांमध्ये खोडतोड, व्हाईटनर व ओव्हरराईट असल्यास ते कागदपत्र मान्य केले जाणार नाही.

13. **महाज्योतीने महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) वर्ष 2023 करिता प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शन सूचनामधील Tenure of Financial Assistance , House Rent Allowance , Contingency grant , Medical , Leave , Terms & Conditions , Disbursement / Release of Fellowship, Contingency, HRA, etc. , Monitoring , Release of Last Instalment , Aadhar Seeding , Cancellation of Award या बाबतचे सर्व नियम हे सन 2021 व सन 2022 या दोन्ही वर्षातील निवड झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेल्या आहेत**.

16. सर्व विद्यार्थ्यांनी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) वर्ष 2023 करिता प्रसिद्ध केलेल्या सर्व मार्गदर्शक सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात व त्यानुसार कार्यवाही करावी. आपण आपल्या मार्गदर्शक, संशोधक केंद्र प्रमुख, विद्यापीठ स्तरावरील संबंधित अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

17. संशोधन अहवाल व आवश्यक सर्व कागदपत्रे सादर करण्याची अंतीम दिनांक 30 जुलै, 2025 राहील. आपल्या अडचणी करिता 0712-2870120/0712-2870121 या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

-स्वा-
(प्रशांत वावगे)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन
व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर